**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

**प्रथम खबर अहवाल**

**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S. (पोलीस ठाणे):** सातारा शहर **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0261 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 24/03/2026 00:32 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** सोमवार **Date from (दिनांक पासून):** 23/03/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 23/03/2026

**Time Period (कालावधी):** प्रहर ६ **Time From (वेळेपासून):** 16:56 तास **Time To (वेळेपर्यंत):** 16:56 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 24/03/2026 **Time (वेळ):** 00:05 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 004 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 24/03/2026 00:31 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 3 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** तालुका कषी अधिकारी कार्यालय, सातारा कार्यालयात ,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुप्रिया सुभाष गावडे

(b) **Husband's Name (चे नाव ):** सुभाष गावडे

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1992

(d) **Nationality (राष्‍ ट्रीयत्‍ व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | देशमुख सिटी, , रामकुंढ सातारा , सातारा शहर, सातारा, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | देशमुख सिटी, , रामकुंढ सातारा , सातारा शहर, सातारा, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-7758082005

**7.** **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| **S. No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address(वर्तमान (पत्ता))** |
|---|---|---|---|---|
| 1 | युवराज अन्याबा काटे | | वडील चे नाव : अन्याबा काटे | 1. फ्लट नंबर ए 2,साई विश्व अर्पाटमेंट,Town/Village (शहर / गाव): कष्णानगर,सातारा,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): सातारा शहर,District (जिल्हा): सातारा,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8.** **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9.** **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S. No. (अ.क्र.)** | **Propertty Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (विवरण)** | **Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये)** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10.** **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11.** **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| **S. No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.)** |
|---|---|

**12.** **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

खबरी जबाब दि. 24/03/2026

मी सुप्रिया सुभाष गावडे वय 34 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा रा. देशमुख सिटी, रामकुंढ सातारा ता.जि.सातारा मोनं - 7758082005

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा येथे पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे. दि. 23/03/2026 रोजी 10.00 वा. चे सुमारास श्री. राजेश वाघमारे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. सातारा यांनी आम्हास समक्ष कळविले की, त्यांचे कक्षात हजर असलेले तक्रारदार प्रथमेश प्रमोद जाधव वय 35 वर्षे, व्यवसाय - राणा अॅग्रोटेक, रा. वेचले ता.जि.सातारा यांची ओळख करुन देवुन त्यांचे राणा अॅग्रोटेक, कपंनीमध्ये उत्पादीत होणारी खते व शेती औषधांची चालु कृषी वर्षामध्ये तपासणी करुन गुणवत्ता अहवाल विरोधात न देण्यासाठी युवराज काटे, कृषी अधिकारी गुणनियंत्रण, तालुका कृषी अधिकारी कार्यालय सातारा 80,000/- रुपये लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रार असुन त्यांचे तक्रारीवर पुढील कायदेशीर कारवाई करा असे आम्हास आदेशित केले.

त्यानुसार आम्ही सहायक कामगार आयुक्त कार्यालय सातारा येथील दोन शासकीय पंचांना पंच म्हणुन काम करणेसाठी उपस्थित राहणेबाबत सुचना दिल्या त्यानुसार पंच म्हणुन 1. हर्षल किशोर धापटे, शॉप इन्स्पेक्टर श्रेणी - 2 व 2. धनाजी वसंत जाधव, शॉप इन्स्पेक्टर श्रेणी - 2 हे उपस्थित राहीले. त्यावेळी आम्ही दोन्ही पंचांना सापळा पथकातील पोहवा ताटे, राजपुरे, पोशि कणसे, देशमुख, थोरात, कदम यांची ओळख करुन दिली. त्यानंतर आम्ही पंच साक्षीदार यांना तक्रारदार श्री. प्रथमेश जाधव यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून त्यांची तक्रार नोंदवून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणे आहे त्याकामी आपण पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता त्यास नमुद दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला. त्याप्रमाणे पंच क्र.1 म्हणून श्री हर्षल किशोर धापटे, पंच क्र.2 म्हणून श्री. धनाजी वसंत जाधव हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार यांनी त्यांची तक्रार प्रथम तोंडी कथन केली व नंतर लेखी स्वरुपात दिली ती पुढीलप्रमाणे. मी वरील प्रमाणे असुन मी वरील ठिकाणचा रहिवाशी असून माझे शिक्षण बी.टेक अॅग्रीकल्चर झालेले असून मला मराठी हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान आहे. माझी स्वत:ची वेचले, सातारा येथे राणा अग्रोटेक नावाची पी.जी.आर.बायोस्टीम्युलंट उत्पादीत करणारी कंपनी आहे. सदरची कंपनी ही सन 2018 सालापासून जिल्हा उद्योग केंद्र येथे व एफसीओ येथे रजिष्टर असून त्याचे सर्व परवाने माझ्याकडे आहेत.

सदर कंपनीमध्ये बायोस्टीम्युलंट खते व शेतीची औषधे तयार करण्यात येतात. माझे कंपनीत तयार करण्यात येणारे खत व औषध तयार झाल्यानंतर त्याची तपासणी तालुका कृषी विभागाकडील गुणनियंत्रण विभागाकडुन करण्यात येते. तपासणी झाल्यानंतर विहीत निकष पुर्ण केले असतील तर खते व औषधे बाजारात विक्रीसाठी परवागनी दिली जाते. गुणनियंत्रण विभागाकडुन उत्पादित खते व औषधे यांचा गुणनियंत्रण अहवाल विरोधात असेल तर सदर खतांची व औषधांची विक्री करता येत नाही. तसेच विक्री परवाना निलंबीत अथवा रद्द करण्यात येतो.

दिनांक 10/03/2026 रोजी मी माझे कंपनीमध्ये असताना तालुका कृषी विभाकाडील गुणनियंत्रण विभाग सातारा कार्यालयाचे कृषी अधिकारी, गुणनियंत्रण, युवराज काटे हे सकाळी 11.00 वा चे सुमारास माझे कंपनीत आले. त्यावेळी त्यांनी माझ्या कंपनीचे लायसन्स, इतर कागदपत्रे व संपुर्ण कंपनीची पाहणी केली. त्यावेळी त्यांनी माझ्याकडे येणा-या कृषी वर्षात कंपनीत तयार होणा-या खते व औषधांची तपासणी करणार नाही व तपासणी केल्यास तपासणी अहवाल विरोधात देणार नाही असे म्हणुन माझ्याकडे 80,000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझे गोडावुन

जळले असल्याचे सांगीतले त्यावेळी युवराज काटे यांनी मला दिनांक 23/03/2026 रोजीपर्यंत पैशाची जुळणी करुन भेट घेण्यास सांगीतले.

गुणनियंत्रण विभागाकडुन कंपनीची व उत्पादनांची तपासणी करण्यात येते. त्यांनी तपासणी अहवाल कंपनीचे विरोधात दिला तर कंपनीमध्ये उत्पादीत केलेली खते व औषधे मला विक्री करता येत नाहीत. त्यामुळे मी त्यांना नाईलाजाने लाच रक्कम देण्यास होकार दिला आहे. परंतु त्यांना लाच रक्कम देण्याची माझी अजिबात इच्छा नाही. तालुका कृषी अधिकारी कार्यालय सातारा येथील युवराज काटे, कृषी अधिकारी, गुणनियंत्रण हे माझ्याकडे मागणी करत असलेली रक्कम लाच असलेची माझी खात्री झाली आहे.

मी दिनांक 23/03/2026 रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालय सातारा येथील युवराज काटे, गुणनियंत्रण, यांची तालुका कृषी कार्यालय, सातारा येथे जावुन भेट घेणार असुन त्यांचेशी माझ्याकामाबाबत चर्चा करणार आहे. चर्चेदरम्यान त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केलेस त्यांचेवर आपले विभागाकडुन कायदेशीर कारवाई करणेस विनंती आहे. युवराज काटे, गुणनियंत्रण, तालुका कृषी अधिकारी कार्यालय सातारा यांचेत व माझेत कोणताही आर्थिक व्यवहार नसुन पुर्ववैमनस्य नाही. या मजकुराचा सहीचा तक्रारी अर्ज हजर केला. त्यावर आम्ही व पंचानी सह्या केल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. प्रथमेश जाधव यांचेकडे लोकसेवक युवराज काटे, गुणनियंत्रण, तालुका कृषी अधिकारी कार्यालय सातारा हे लाच मागणी करतात अगर कसे? याबाबतची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविले. त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये केडीएम कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड वेस्टनातुन बाहेर काढले ते व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले. तक्रारदार व पंच यांना व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती दिली तसेच त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली. तसेच पोहवा ताटे ला.प्र.वि. सातारा कार्यालयाकडील व्हिवो कंपनीचे मोबाईल मध्ये केडीएम कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड घातले सदर मोबाईल फोन मध्ये सापळा कारवाई वेळीचे निवेदन व लाच रक्कम व कागदपत्रे जप्तीचे छायाचित्रण करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार, तक्रारदार व सापळा पथकास पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर 12.02 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार जाधव व पंच क्र.1 हर्षल धापटे पंच क्र. 02 धनाजी जाधव यांचे पडताळणी कारवाईचे निवेदन घेतले. तक्रारदार व पंचांचे निवेदन घेतलेनंतर आमचे सुचनेवरुन पोहवा राजपुरे यांनी व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांनी परीधान केलेल्या शर्टच्या आतील बनियानला लाऊन दिला. त्यानंतर तक्रारदार यांना तालुका कृषी अधिकारी कार्यालय, सातारा येथे जाणेसाठी पंच नंबर 1 यांचेसोबत तक्रारदार यांचेकडील महींद्रा कंपनीचे एक्सयुव्ही 700 चारचाकी वाहन क्रमांक एम एच 11 डी एन 4044 मधुन रवाना केले.

त्यानंतर आम्ही सापळा पथक पंच क्र.02 असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा कार्यालयात थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 12.36 वा.ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 पाटील यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे तालुका कृषी अधिकारी कार्यालय सातारा येथे गेलो तेव्हा तक्रारदार यांनी तेथे उपस्थीत असलेल्या इसमास ""काटे साहेब... काटे साहेब"" असे विचारले असता

त्यांनी असत्याली बाहेर असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल फोन नंबर 8600729924 वरुन लाउड स्पीकर ऑन करुन लोकसेवक युवराज काटे यांचे मोबाईल फोन नंबर 9503606821 वर फोन करुन हा ""नमस्कार काटे साहेब प्रथमेश जाधव बोलतोय"" असे म्हणाले. त्यावर युवराज काटे ""हा बोला"" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार ""हा सर आलो होतो ऑफिसला"" असे म्हणाले. त्यावर युवराज काटे ""मी बाहेर आहे"" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी ""बाहेर आहे का .. मग सर किती वाजता वगैरे येवु"" असे विचारले त्यावर काटे यांनी ""दुपारी आहे दोन वाजता"" असे सांगीतले. तेव्हा तक्रारदार यांनी ""दोन वाजता येवु का.. बर बर चालतय मग सर.. दोन वाजता येतो मग सर.. कुठ सातारा मध्ये येवु का  कोठे येवु"" असे विचारले त्यावर युवराज काटे यांनी ""ऑफीसला हाय."" असे सांगीतले. त्यानंतर मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचे चारचाकी वाहनातुन सापळा पथक थांबले ठिकाणी परत आलो वगैरे हकीकत सांगीतली. त्यानंतर तक्रारदार यांना हकीकत विचारली असता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकुन ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

एकंदरीत यातील तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे दिनांक 23/03/2026 रोजी केले पडताळणी कारवाईमध्ये तक्रारदार व लोकसेवक युवराज काटे यांची भेट झाली नसल्याने व लोकसेवक यांनी तक्रारदार यांना दुपारी दोन वाजता भेटण्यास बोलाविले असल्याची खात्री झाली. त्यानुसार दुपारी दोन वाजता पुन्हा पडताळणी कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर पुन्हा पडताळणी कारवाईचे नियोजन करण्यात आले. त्यानुसार दिनांक 23/03/2026 रोजी 14.35 वा. व्हॉईस रेकॉर्डर ऑन करुन पुन्हा तक्रारदार यांना पंच नंबर 1 यांचेसह लोकसेवक यांची भेट घेणेकामी तालुका कृषी अधिकारी कार्यालय सातारा येथे रवाना केले. त्यावेळी आम्ही सापळा पथक पंच क्र.02 असे ला.प्र.वि.सातारा कार्यालयात थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 15.50 वा.ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 धापटे यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे तालुका कृषी अधिकारी कार्यालय सातारा येथे गेलो तेव्हा तक्रारदार जाधव यांनी त्यांचे मोबाईल फोनवरुन युवराज काटे यांचे मोबाईल फोनवर फोन लावला तेव्हा युवराज काटे यांनी ""हु मला एक अजुन एक अर्धा तास लागतोय"" असे म्हणुन अर्धा तास थांबण्यास सांगीतले. त्यानुसार आम्ही कार्यालयाचे बाहेर लोकसेवक युवराज काटे यांची वाट पाहत बसलो. काही वेळाने एक इसम बाहेरुन कार्यालयाचे समोर आला व तक्रारदार यांना ""या की"" असे म्हणाला तेव्हा मला ते लोकसेवक युवराज काटे असल्याचे समजले. त्यानंतर आम्ही तालुका कृषी अधिकारी कार्यालयाचे आत मध्ये गेलो. तेव्हा युवराज काटे हे त्यांचे आसनावर बसले तेव्हा मी व तक्रारदार युवराज काटे यांचे समोर उभे राहीलो. त्यावेळी तक्रारदार व युवराज काटे आपसात चर्चा करु लागले तेव्हा युवराज काटे ""कॅटलॉग, एक बार तपासणी करावीच लागेल"" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार ""हां ते तर हायच की"" असे म्हणाले. त्यावर काटे ""मागच्या वर्षीची तपासणी करावी लागेल खताची तुमच्या त्यासाठी आलो"" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार ""बरोबर, तुम्हीच सांगा थोड जरा हे करुन सांगा, जास्त होतय जरा कस हाय तुम्ही सांगाल तस करायची, करुन टाकु, काय थोडफार नुकसान झालय नायतर तस मग कधी

हे नाय अस काय मात्र परिस्थिती भी तुम्ही बघीतली माझी, थोड काय होईल सहकार्य केल तर बर होईल, त्यात पाठीमाग पण, बाकीचे जिल्हयाचे अधिकारी येवुन गेले. तुम्हाला बोललो होतोच मी."" असे म्हणाले. त्यावर काटे ""तुमचा तो तपासणी रोल होता, तपासणी चालु होती आता ऑन गोईंग तपासणी"" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार ""हा तुमची तपासणी झालेलीच आहे."" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व युवराज काटे यांनी तक्रारदार यांचे कामाबाबत चर्चा केली. तेव्हा तक्रारदार ""तुम्ही सांगा की राव, मदत करा गोडावुन जळाल नसत तर मग काय विषय नसता, काय जरा परिस्थिती जरा थोडी नाजुक झाली बाकी काय नाय, नुकसान जरा मोठ झाल, जास्त काय नाय सहकार्य असु द्या, आहे आपल, तुमच आपल असु द्या, वर्षभर आपली तुमची माझी आसु द्या राहु द्या, काय अडचण नाय"" असे म्हणाले. त्यावर काटे
""तस झाल की लॅकुणा साठतय, वर्षातुन एकदाच तपासणी असती"" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार ""बर बर वर्षातल एकदाच तपासणी"" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक काटे यांनी पुन्हा त्यांचे कामाबाबत चर्चा केली. तेव्हा तक्रारदार ""होय का बर बर बर, तुम्ही सांगा सर कस कस करायच ते"" असे म्हणाले. तेव्हा लोकसेवक काटे ""सांगतो सांगतो"" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार ""तुम्हीच सांगा सर, मी काय सांगु, कस होतय"" असे म्हणाले. तेव्हा लोकसेवक काटे यांनी त्यांचेकडील मोबाईमधील कॅल्क्युलेटरवर 80,000 असा आकडा टाईप करुन दाखविला व तक्रारदार यांना ""मी दाखवलय ते आणलय का?"" असे विचारले. त्यावर तक्रारदार ""तुम्ही आता काय झालय सर एवढे ऐंशी हजार रुपये जास्त होतात सर, तेवढं जरा सहकार्य करा, बाकी काय नाय"" असे म्हणाले. त्यावर युवराज काटे ""मग आस म्हणाल तर, तुम्ही स्वतःच मी काय वेगळ सांगितलय का"" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार ""तुम्ही सांगा मला कस कस थोड जरा कमी जास्त करुन विषय करु आपण"" असे म्हणाले. त्यावर युवराज काटे ""सत्तर हजार रुपये"" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार ""सत्तर हजार, जरा थोडस जरा बघा, थोड फार हे करुन आता थोडं फार देतो आणि महिन्यान देतो, सीझन चालु होतोच, सीझन मधी हायच की सर, तपासणीचेवेळी मी स्वतःहुन देतो कायच अडचण नाय, मला थोडा वेळ द्या, जर हे नसत ना सर, गोडावुन जळल नसत ना, एवढ तुम्हाला, थोड फार हे करुन करुया म्हणल असत करुया काय अडचण नाय, अशी झालीया अडचण, सत्तर हजार काय होतय, जरा लय"" असे म्हणाले. त्यावर युवराज काटे ""पुन्हा पुन्हा करुन तुम्ही ते करता"" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार ""नाय नाय"" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार ""आता थोड फार करतो सर, थोड हे करा, कस करायच, थोडा डिस्काऊंट द्या आम्हाला काय, गोडावुन नसत जळल तर नुकसानच हाय, थोडा फार डिस्काऊंट द्या, कमी करा थोड प्लिज. ऑफीसला कोण नव्हत म्हणुन मीच आलो."" असे म्हणाले. त्यावर युवराज काटे ""सकाळी फोन केला व्हता तुम्ही"" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार हा म्हणाले. त्यानंतर युवराज काटे ""हां, आमच्याकड कॅमेरा चालु आहे"" असे म्हणाले. त्यानंतर आम्ही कार्यालयाचे बाहेर आलो. त्यानंतर मी व तक्रारदार तसेच युवराज काटे एका इंडिका गाडीमध्ये बसलो. तेव्हा तक्रारदार ""हा बरोबर आता आम्हाला काय माहित नाय कॅमेरा हायत वगैरे, नाय नाय माहितच नाय ना, मी पहिल्यांदा ऑफीसला आलो, कधी आलो नाय, अजुन वर्षभर सहकार्य करा"" असे म्हणाले. त्यावर युवराज काटे हे ""एकदा शब्द म्हणजे शब्द असतो परत परत तुम्हाला काय डावलनार नाय"" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार हां बरोबर असे म्हणाले. तेव्हा युवराज काटे ""फायनानशियल इयर चा विषय हाय

हा, पुढचा फायनानशियल पुढच्या वर्षी""असे म्हणाले. त्यानंतर युवराज काटे ""तुम्ही काय करता आता किती करणार होत"" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार ""तुम्ही सांगा मी तात्काळपुर्व करतो, फक्त दोन तीन महिन्यांनी राहिल्याल देतो"" असे म्हणाले. त्यावर युवराज काटे ""आता किती म्हणताय"" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार ""आता तुम्हीच सांगा सर किती पन्नास एक हजार देतो, काय थोड करा जरा"" असे म्हणाले. त्यावर युवराज काटे ""करा फायनल, बाकी काय करु नका, तेवढच फायनल करा"" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार ""चालतय सर कॅश तिकडच, तुम्हाला कुठ"" असे म्हणाले. तेव्हा युवराज काटे यांनी ""मित्र आणाय गेलाय का"" असे विचारले. तेव्हा तक्रारदार ""नाय माझी गोडोली ऑफीसला आहे"" असे म्हणाले. तेव्हा युवराज काटे ""मी काय करतो किरण सीडस, कमल सीडस म्हणुन आहे बॉम्बे रेस्टॉरंटला"" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार हा म्हणाले. तेव्हा युवराज काटे ""स्टेट बँकेच्या तिथ"" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार ""तुम्हाला देतो साहेब नाय काय अडचण सर, तिथ देवु का, किरण सीडस"" असे म्हणाले. तेव्हा युवराज काटे ""कमल, कमल सिडस"" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार ""चालतय, सर नाही काही अडचण"" असे म्हणाले. त्यावर युवराज काटे ""लॅब नाही, काय नाही सगळ पोस्टल करायच आहे ठरवा तुम्ही"" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार ""ऑफीस जरा जळाल्यामुळे थोड इकडे शिफ्ट केल बाकी काय नाय राहत्या परिस्थितीला"" असे म्हणाले. तेव्हा युवराज काटे ""तेवढ तर राहतय, तासाभरान कर नायतर दोन तासाने"" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार ""हा चालतय की"" असे म्हणाले त्यानंतर चर्चा करुन मी व तक्रारदार पुन्हा तक्रारदार यांचेकडील चारचाकी वाहनातुन सापळा पथक थांबले ठिकाणी परत आलो. वगैरे हकीकत सांगीतली. त्यानंतर तक्रारदार यांना हकीकत विचारली असता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकुन ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

एकंदरीत यातील तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे दिनांक 23/03/2026 रोजी केले पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक युवराज काटे, गुणनियंत्रण तालुका कृषी अधिकारी कार्यालय सातारा यांनी तक्रारदार यांचे राणा अँग्रोटेक या कंपनीमध्ये तयार करण्यात येणा-या खते व शेती औषधे यांची चालु वर्षीची गुणवत्ता तपासणी करुन गुणवत्ता अहवाल जिल्हा कृषी अधिकारी सातारा यांचेकडे विरोधात न देण्यासाठी पंच नंबर 1 यांचे समक्ष तक्रारदार यांचेकडे 80,000/- हजार रुपये लाच मागणी करुन तडजोडीअंती 50,000/- रुपये लाचेची मागणी केली. तसेच लाच रक्कम बॉम्बे रेस्टॉरंट सातारा येथील कमल सिड्स नावाचे दुकानात एका तासात आणुन देण्यास सांगीतलेची खात्री झाली.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार प्रथमेश जाधव यांना सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरु करण्यात येत असल्याबाबत सांगितले. त्यानंतर आमचे सुचनेनुसार तक्रारदार जाधव यांना दोन्ही पंचांसमक्ष लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी लाच रक्कम पन्नास हजार रुपये हजर केले. त्यानंतर पोशि देशमुख यांनी नमुद नोटांचे नंबर कार्यालयातील संगणकावर टंकलिखीत करुन त्याची प्रिंट काढली त्यावर आम्ही व पंचांनी सह्या केल्या.

त्यानंतर आम्ही कार्यालयाचे कक्षात दारे खिडक्या व लाईट बंद करुन कृत्रीम अंधारात दोन्ही पंचांना व तक्रारदार जाधव यांना अंन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून त्याचे

प्रात्यक्षिक पोशि थोरात यांनी करून दाखवले. त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेली लाच रक्कम पोशि थोरात यांना अँन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिली. तेव्हा पोशि थोरात यांनी कापसाच्या बोळयाने चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस अँन्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर पोशि थोरात यांनी लाच रक्कम तक्रारदार यांचे पॅन्टचे उजव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर पोशि थोरात यांना सापळा पथकातुन वगळण्यात आले. त्यानंतर आम्ही पंचांना, तक्रारदार व पोलीस पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या प्रमाणे सूचना दिल्या. तसेच तक्रारदार यांना लाच रक्कम स्विकारलेनंतर डावा हात डोक्यावरुन दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर 16.34 वा. डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये प्रथम तक्रारदार प्रथमेश जाधव त्यानंतर पंच क्र.01 व पंच क्र.02 यांचे सापळा निवेदन ध्वनीमुद्रीत केले. सापळा निवेदनाचे छायाचित्रण पोहवा ताटे यांनी कार्यालयाचे मोबाईल फोन मध्ये केले आहे. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोहवा राजपुरे यांनी व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांनी परीधान केलेल्या शर्टच्या आतील बनियानला लाऊन दिला. त्यानंतर तक्रारदार व पंच नंबर 1 हे तक्रारदार यांना मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार यांचेकडील चारचाकी वाहनातुन रवाना झाले. त्यांचेपाठोपाठ आम्ही, पंच नंबर 2, सापळा पथक असे ला.प्र.वि.सातारा कार्यालयातुन शासकिय वाहनातुन रवाना झालो. तक्रारदार हे त्यांचेकडील चारचाकी वाहनाने पंच नंबर 1 यांना घेवुन बॉम्बे रेस्टॉरंट, सातारा येथे गेले. त्यावेळी तक्रारदार व पंच नंबर 1 हे कमल सिड्स दुकानजवळ गेले व पुन्हा येवुन तक्रारदार यांचे चारचाकी वाहनात बसले व तेथुन जावु लागले म्हणुन आम्ही, पंच नंबर 2 व सापळा पथक त्यांचे पाठोपाठ गेलो. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे चारचाकी वाहन तालुका कृषी अधिकारी कार्यालय सातारा समोर पार्क केले. त्यावेळी सापळा पथक तालुका कृषी अधिकारी कार्यालय सातारा चे आसपास कोणासही संशय येणार नाही अशा रितीने परिसरात थांबून राहीले.

तक्रारदार व पंच क्र. 01 हे तालुका कृषी कार्यालयाचे मुख्य प्रवेश द्वारा जवळ चालत गेले. त्यावेळी एक इसम येवुन त्याचे चारचाकी वाहनात बसला त्यावेळी तक्रारदार हे त्याचेसोबत चारचाकी वाहनात बसले. त्यावेळी पंच नं. 1 हे वाहना जवळ उभे होते.थोड्यावेळाने तक्रारदार व सदर इसम चारचाकी वाहनातुन खाली उतरले त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचा डावा दोन वेळा डोक्यावर फिरवुन लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजित इशारा केला तेव्हा सापळा पथकातील अंमलदार, आम्ही व पंच नंबर 2 त्यांचेजवळ गेलो. तेव्हा आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 16.56 वा ची होती. तेव्हा आडोशास थांबुन राहीलेल्या सापळा पथकातील पोशि कणसे व पोशि देशमुख यांनी सदर इसमाचा अनुक्रमे डावा व उजवा हात मनगटाजवळ पकडला ती वेळ 16.57 वा ची होती. तेव्हा आम्ही त्यास स्वत:ची ओळख सांगुन त्यांचे नाव व पदाबाबत माहीती विचारली असता त्यांनी त्यांचे नाव युवराजसुनिल दाजी पाटील पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा अन्याबा काटे, वय 54 वर्षे, कृषी अधिकारी गुणनियंत्रण, तालुका कृषी अधिकारी कार्यालय सातारा रा. फ्लॅट नंबर ए 2, साई विश्व अर्पाटमेंट, कृष्णानगर, सातारा ता.जि.सातारा वर्ग - 2 असे असल्याचे सांगीतले.

त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना लाच रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी लोकसेवक युवराज काटे यांनी सांगीतले प्रमाणे 50,000/- रुपये लाच रक्कम त्यांचे चारचाकी वाहनाचे डॅशबोर्ड मध्ये

ठेवली असल्याचे सांगीतले. त्यावेळी यापुर्वी दिलेल्या सुचनेप्रमाणे पोहवा ताटे यांनी व्हिडीओ चित्रीकरण सुरु केले. त्यावेळी आमचे सुचनेवरुन पंच नंबर 2 यांनी लोकसेवक युवराज काटे यांचे चारचाकी वाहनातील लाच रक्कम ताब्यात घेतली. त्यावेळी पंच नंबर 2 यांनी लाच रकमेच्या नोटांची पडताळणी केली असता त्या सापळापुर्व कारवाई वेळी नमुद केलेप्रमाणे बरोबर असल्याचे सांगीतले. त्यावेळी चारचाकी वाहनात कृत्रीम अंधार करुन डॅशबोर्डची आतील बाजुस अल्ट्रा व्हायलेट दिव्याच्या प्रकाशामध्ये दोन्ही पंचासमक्ष तपासणी केली असता इंडिगो कारचे डॅशबोर्डचे आतील बाजुस अंथ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. तसेच हस्तगत केलेल्या पंन्नास हजार रुपये लाच रकमेस अंन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली.

त्यानंतर आम्ही लोकसेवक युवराज काटे यांना घेवुन तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील त्यांचे कक्षात गेलो. तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील भांडार रुमची लाईट बंद करुन कृत्रीम अंधारामध्ये युवराज काटे यांचे दोन्ही हात अल्ट्रा व्हायलेट दिव्याच्या प्रकाशामध्ये दोन्ही पंचासमक्ष तपासणी केली असता युवराज काटे यांचे दोन्ही हातांना निळसर चकाकी दिसुन आली नाही. हस्तगत केलेल्या 50,000/- रुपये लाच रकमेस अन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. तसेच पंच क्र.02 यांचे हातासही अँन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर तक्रारदार यांचे हाताची तपासणी केली असता त्याचे उजवे  हातास अँन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर युवराज काटे यांना तक्रारदार यांचे कामाबाबतचे कागदपत्रांबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे बॅगमधुन तक्रारदार यांचे राणा अँग्रोटेक कंपनीचे इन्स्पेक्शन रिपोर्टची कागदपत्रे काढुन दिली. सदर कागदपत्रे दोन्ही पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आली आहेत. सदरवेळी पोहवा ताटे यांनी कार्यालयाचे मोबाईल फोनमध्ये लाच रक्कम जप्तीचे, तसेच कागदपत्रे जप्तीच्या कारवाईचे छायाचित्रण केले आहे.

त्यानंतर सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा कार्यालय येथे जावून करण्याचे सर्वानुमते निश्चित केले. ला.प्र.वि.सातारा कार्यालयात आम्ही पंच नंबर 1 यांना घडलेल्या हकीकतीविषयी विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचे चारचाकी वाहनातुन बॉम्बे रेस्टॉरंट चौक सातारा येथील कमल सिड्स दुकानासमोर गेलो असता दुकान बंद होते. त्यामुळे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचे चारचाकी वाहनातुन तालुका कृषी अधिकारी कार्यालय सातारा येथे गेलो. त्यावेळी मी व तक्रारदार कार्यालयाचे गेटवर गेलो असता लोकसेवक युवराज काटे हे कार्यालयाचे मुख्य दरवाजावरच उभे होते. त्यावेळी तक्रारदार युवराज काटे यांना ""साहेब दुकान बंद आहे"" असे सांगीतले. तेव्हा युवराज काटे ""बंद आहे ?"" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व युवराज काटे हे चालत बाहेर जावु लागले त्यावेळी मी त्यांचे पाठीमागे चालत गेलो. त्यावेळी तक्रारदार  युवराज काटे यांना ""कुठंतरी बाहेर गेलेत ती"" असे सांगीतले. त्यावर काटे ""होय का, चला येवु का जरा मला आहे जरा काम"" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार त्यांना ""नाहीतर मग आलो होतो.. बाहेर जावुन देवु का, घेवुन टाका की दोन मिनीटांत.. थांबाय लागल तो येस्तोपर्यंत"" असे म्हणाले. त्यावेळी युवराज काटे व तक्रारदार हे युवराज काटे यांचे इंडिका कारमध्ये पुढील सिटवर जावुन बसले. त्यावेळी मी त्यांचे सोबत जावुन इंडिका कारचे जवळ बाहेर उभा राहीलो. त्यावेळी इंडिका कारच्या काचा खाली होत्या त्यामुळे मला तक्रारदार व युवराज काटे यांचेत होणार संभाषण ऐकु येत होते व दिसत होते. तेव्हा युवराज काटे तक्रारदार यांना ""तुला

म्हणलेले तिथं.."" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार त्यांना ""नाही ते बंद हाय.. मुलगा बिलगा असतो.. मार्केटींग वाले असत्यात."" असे म्हणाले. तेव्हा युवराज काटे यांनी बोटाने खुनवुन तक्रारदार यांना इंडिका कारचे डॅशबोर्ड मध्ये पैसे ठेवणेबाबत इशारा केला. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचेकडील 50,000/- रुपये लाच रक्कम इंडिका गाडीचे डॅशबोर्डमध्ये ठेवुन दिली व त्यांना ""पन्नास आहेत..मोजुन घ्या"" असे म्हणाले त्यावर ते ""ठिक आहे"" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व युवराज काटे चारचाकी वाहनातुन बाहेर आले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचे डोक्याचे केसावरुन डावा हात दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी आडोशास थांबलेल्या सापळा पथकातील अंमलदारांनी युवराज काटे यांना ताब्यात घेतले. त्यानंतर तक्रारदार प्रथमेश जाधव यांना हकीकत विचारता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकुन ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

यातील तक्रारदार प्रथमेश प्रमोद जाधव वय 35 वर्षे, व्यवसाय - राणा अँग्रोटेक, रा. वेचले ता.जि.सातारा यांनी दिनांक 23/03/2026 रोजी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 23/03/2026 रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालय सातारा कार्यालयात पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई वेळी तक्रारदार यांचे राणा अँग्रोटेक या कंपनीमध्ये तयार करण्यात येणा-या खते व शेती औषधे यांची चालु वर्षीची गुणवत्ता तपासणी करुन गुणवत्ता अहवाल जिल्हा कृषी अधिकारी सातारा यांचेकडे तक्रारदार यांचे विरोधात न पाठविण्यासाठी लोकसेवक युवराज अन्याबा काटे, वय 54 वर्षे, कृषी अधिकारी गुणनियंत्रण, तालुका कृषी अधिकारी कार्यालय सातारा रा. फ्लॅट नंबर ए 2, साई विश्व अर्पाटमेंट, कृष्णानगर, सातारा ता.जि.सातारा वर्ग - 2 (कनिष्ठ) यांनी पंच नंबर 1 यांचे समक्ष तक्रारदार यांचेकडे 80,000/- हजार रुपये लाच मागणी करुन तडजोडीअंती 50,000/- रुपये लाचेची मागणी केली. तसेच पन्नास हजार रुपये लाच रक्कम तक्रारदार यांना सापळा कारवाई वेळी तालुका कृषी अधिकारी कार्यालय सातारा चे समोर आरोपी लोकसेवक युवराज काटे यांनी बोटाने खुनावून टाटा इंडिका कारचे डॅशबोर्ड मध्ये ठेवण्यास सांगुन पंचासमक्ष स्विकारली आहे. म्हणुन माझी त्यांचेविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

समक्ष हा खबरी जबाब दिला.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**

**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‌ वेषणफॉर्म - १)**

**Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** AVINASH dnyaneshwar MANE (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):** **or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** AVINASH dnyaneshwar MANE

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PSMH27226

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी)) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** |
| 1 | पुरुष | 1972 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग / वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| **8** | **9** | **10** | **11** | **12** | **13** |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| **14** | **15** | **16** | **17** | **18** | **19** | **20** |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)**